RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ४, अंक २७(२)] शुक्रवार, फेब्रुवारी २३, २०१८/फाल्गुन ४, शके १९३९ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कृषी व पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ फेब्रुवारी २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक मपवि २०१७/प्र. क्र. ५७/म्हापसू.—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. २८) याच्या कलम २ च्या खंड (द) आणि कलम ३ ची पोट-कलमे (१) व (२) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेले पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गतचा शैक्षणिक अभ्यासक्रम हे, व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम म्हणून घोषित व अधिसूचित करीत आहे; आणि अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये अशा अभ्यासक्रमाच्या संबंधात प्रवेशासाठी नमूद केलेल्या अटी व शर्ती ह्या, त्यासाठीच्या पात्रतेच्या अटी व शर्ती असतील असे विनिर्दिष्ट करीत आहे :—

**अनुसूची**

| अ. क्र. | व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम | प्रवेशासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अभ्यासक्रम** | |
| (१) | बी.टेक (डी.टी.) दुग्ध तंत्रज्ञान पदवी प्राप्त करण्यासाठी चार वर्षाच्या संकलित अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | (१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १२वी (१० + २) परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित किंवा इंग्रजी विषयात एकत्रीतपणे अराखीव प्रवर्गाकरिता किमान ५०% गुण व राखीव प्रवर्गाकरिता किमान ४०% गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक. |

**अनुसूची—**समाप्त.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | (२) सक्षम प्राधिकाऱ्याकडून आयोजित करण्यात आलेल्या संबंधित वर्षाच्या सामायिक प्रवेश परीक्षेतील (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित) प्राप्त गुण. |
| | **महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत अभ्यासक्रम** | |
| २. | बी.एफ.एस्सी मत्स्यविज्ञान पदवी प्राप्त करण्यासाठी चार वर्षाच्या संकलित अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | (१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १२वी (१० + २) परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित किंवा इंग्रजी विषयात एकत्रीतपणे अराखीव प्रवर्गाकरिता किमान ५०% गुण व राखीव प्रवर्गाकरिता किमान ४०% गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>(२) सक्षम प्राधिकाऱ्याकडून आयोजित करण्यात आलेल्या संबंधित वर्षाच्या सामायिक प्रवेश परीक्षेतील (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) प्राप्त गुण.<br>(३) पात्रता परीक्षेमध्ये जीवशास्त्र/गणित हे विषय घेतले नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील. |
| | **महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी अंतर्गत अभ्यासक्रम** | |
| ३. | बी. एस्सी (ऑनर्स) पशुसंवर्धन पदवी प्राप्त करण्यासाठी चार वर्षाच्या संकलित अध्ययनक्रमाचे प्रथम वर्ष. | (१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १० + २ पद्धतीनुसार इयत्ता १२वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र किंवा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र गणित, जीवशास्त्र किंवा इंटर कृषी (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र सह) आणि इंग्रजी विषयासह उत्तीर्ण.<br>आणि<br>(२) सक्षम प्राधिकाऱ्याकडून आयोजित करण्यात आलेल्या संबंधित वर्षाच्या सामायिक प्रवेश परीक्षेतील (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) प्राप्त गुण.<br>(३) पात्रता परीक्षेमध्ये जीवशास्त्र / गणित हे विषय घेतले नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**किरण कुरुंदकर,**

शासनाचे सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, Dated 23rd February 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UN-AIDED PRIVATE, PROFESSIONAL EDUCATION INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSION AND FEES), ACT, 2015.

No. File No. MaPavi 2017 /CR No. 57/2017.—In exercise of the powers conferred by clause (r) of section 2 read with sub-sections (*1*) and (*2*) of section 3 of the Maharashtra Un-aided Private Professional Educational Institutions (Regulations of Admission and Fees) Act, 2015 (Mah. Act No. 28 of 2015), the Government of Maharashtra hereby declares and notifies the additional educational courses of studies of the Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department mentioned in column (2) of the schedule appended hereto shall be the Professional Educational Courses for the purpose of said act and specifies that the conditions and the requirements for admissions mentioned respectively against it in column (3) of the schedule shall be the eligibility conditions and requirements for admission to such professional education.

*Schedule*

| Sr. No. (1) | Professional Educational Courses (2) | Eligibility Conditions and Requirements for Admission (3) |
|---|---|---|
| | **Courses under Maharashtra Animal and Fishery Sciences University, Nagpur** | |
| 1. | First year of four year integrated programme leading to B. Tech. (D.T.) Degree Course | (1) Candidates who have passed XII Std. (10 + 2) with 50% marks for Unreserved category and 40% marks for Reserved category in Physics, Chemistry, Mathematics and English taken together are eligible for admission to B. Tech. (D.T.) Degree Course.<br>and<br>(2) Obtained score in Common Entrance Test (Physics, Chemistry, Mathematics) of the respective year conducted by the competent authority. |
| | **Courses under Maharashtra Animal and Fishery Sciences University, Nagpur and Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli** | |
| 2. | First year of four year integrated programme leading to B.F.Sc. Degree Course | (1) Candidates who have passed XII Std. (10 + 2) with 50% marks for Unreserved category and 40% marks for Reserved category in Physics, Chemistry, Biology, Mathematics and English taken together are eligible for admission to B.F.Sc. Degree Course.<br>and<br>(2) Obtained score in Common Entrance Test (Physics, Chemistry, Biology) of the respective year conducted by the competent authority. |

| (1) | (2) | (3) |
|---|---|---|
| | | (3) The candidate who have passed qualifying examination without Biology / Mathematics shall have to complete defeciency courses as prescribed by respective university. |
| | **Courses under Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri** | |
| 3. | First year of four year integrated programme leading to B.Sc. (Honours) Animal Husbandry. | (1) XII Std. (Science) passed in 10+2 pattern from Maharashtra State Board of Higher Secondary Education or an equivalent Examination, with Physics, Chemistry, Biology or Physics, Chemistry, Mathematics, Biology or Inter Agricul ture (with Physics, Chemistry) and English. and (2) Obtained score in Common Entrance Test (Physics, Chemistry, Biology) of the respective year conducted by the competent authority. (3) The candidate who have passed qualifying examination without Biology / Mathematics shall have to complete defeciency courses as prescribed by respective university. |

By order and in the name of the Governor of Maharashtra.

KIRAN KURUNDKAR,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.